# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** रामनगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0835 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 17/06/2026 02:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिंनाक पासून):** 16/06/2026
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 16/06/2026
**Time From (वेळेपासून):** 15:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 17/06/2026 **Time (वेळ):** 01:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 009
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 17/06/2026 02:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सहदुय्यम निंबधक कार्यालय,चंद्रपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सचिन सुरेशराव धर्मेजवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,चंद्रपुर,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,चंद्रपुर,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9623055655

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मोहन चंद्रकांत शेट्टीवार | | | 1. अर्जापुर ,बिलोली जि नांदेड, बिलोली,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रिती वैभव चौधरी | | | 1. अंचलेश्वर वार्ड नं 1 दासरकरवाड,चंद्रपुर ,चंद्रपूर शहर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | 1 रियल मी 12 pro 5G | 5,000.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | poco कंपनीचा मोबाईल | 7,000.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | सापडा कार्यवाही मधील लाच रक्कम | 3,000.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | घटनास्थळावरुन जप्त केलेली रक्कम | 10,500.00 |
| 5 | इतर | घरगुती वस्तु | पर्स | 0.00 |
| 6 | इतर | संकीर्ण/विविध | 2 नग 32 GB क्षमतेचा असलेला सॅन्डीस कंपनीचा मेमोरीकार्ड | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,500.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पोलीस ठाणे, रामनगर जि.चंद्रपूर

दिनांक 17/06/2026

माझे नाव सचिन एस. धर्मेजवार, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक-लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, चंद्रपूर, मो.क्र. 9623055655

समक्ष पोलीस ठाणे रामनगर, जि. चंद्रपूर येथे हजर होउन तक्रार लिहुन देतो की, मी माहे जुन/2025 पासून लाचलुचपत प्रतिंबधक विभाग चंद्रपूर येथे कार्यरत आहे.

दिंनाक 16/06/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, कार्यालय चंद्रपूर येथे हजर असतांना वेळ 12/00 वा. दरम्यान मा. पोलीस उप अधीक्षक अनिल जिट्टावार सा. यांनी मला बोलावून एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने तक्रार असल्याचे सांगून तक्रारदाराची भेट करून दिली. त्यावरून सदर तक्रारदारास त्यांचे नाव पत्ता व तक्रारी संबधाने विचारणा केली असता तक्रारदाराने आपले नाव श्री. सुजीत कालीदास गेडाम, वय 49 वर्षे, धंदा-वकिली रा. एल-114, 64/62 म्हाडा वसाहत, दाताळा, नविन चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर असे सांगून त्यांना सुचीत केलेवरून त्यांनी हस्तलिखीत तक्रार सादर केली
सदर तक्रारीवरून लाच मागणीची पडताळणी करून पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजीत करण्यासाठी आमचे कार्यालयातील पोशि/रविंकात इंगळे यांचे हस्ते मा. राज्यकर सहआयुक्त, वस्तु व सेवा कर कार्यालय चंद्रपूर यांना पत्र देवून दोन शासकीय पंच नामे श्री. विनोद मोतीराम ठाकरे, वय 41 वर्षे, धंदा-नोकरी, राज्यकर निरीक्षक व श्रीमती निता संतोष राठोड, वय 46 वर्षे, धंदा-नोकरी, राज्यकर निरीक्षक, वस्तु व सेवा कर कार्यालय चंद्रपूर यांना उपलब्ध करून घेतले.
त्यांनतर दोन्ही पंचाना तक्रारदार श्री. सुजीत कालीदास गेडाम यांनी एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने

दिलेल्या तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करून कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे असे सांगून सदर कार्यवाहीत पंच म्हणून काम करण्याची संमती विचारली असता दोन्ही पंचानी पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्शविल्याने त्यांचे संमतीपत्र घेण्यात आले. त्यावरून पंच क्र. 1) श्री. विनोद मोतीराम ठाकरे, राज्यकर निरीक्षक व पंच क्र. 2) श्रीमती निता संतोष राठोड, राज्यकर निरीक्षक हे काम पाहणार असल्याचे ठरविण्यात आले.

सापळा पार्टीतील सदस्य पोहवा/रविंकात इंगळे, पोहवा/हिवराज नेवारे, पोशि/राजेंद्र चौधरी, पोशि/प्रदीप ताडाम, पोशि/अमोल सिडाम, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/सचिन गजभिये, पोशि/महेश माहुरपवार, मपोशि/मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिश सिडाम, सर्व ला.प्र.वि. चंद्रपूर व चापोशि संदीप कौरासे मो.प.वि.चंद्रपूर तसेच तक्रारदार यांचा नमूद दोन्ही पंचांना परिचय करून देवून तक्रारदार श्री. सुजीत कालीदास गेडाम यांचीच लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे सांगण्यात आले.

त्यांनतर आम्ही, तक्रारदार श्री. सुजीत कालीदास गेडाम यांनी स्व:हस्ताक्षरात लिहून दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. त्यांनतर आमचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबधी तोंडी विचारपूस केली असून तक्रारदाराची तक्रार खालीलप्रमाणे आहे.

''माझे नाव :- श्री. सुजीत कालीदास गेडाम, वय 49 वर्षे, धंदा- वकिली रा. एल-114, 64/62 म्हाडा वसाहत, दाताळा, नविन चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर मो.क्र. 9518528359

सविनय विंनती याप्रमाणे आहे की, मी माझे कुटुंबासह वरिल पत्यावर राहत असुन सन 2007 पासून जिल्हा न्यायालय चंद्रपूर येथे वकीलीचे काम करतो. तसेच यासोबत सह. दुय्यम निबधक कार्यालय क्र. 1 व 2 चंद्रपूर येथे दस्तऐवज नोंदणी करण्याचे काम करतो.

दिंनाक 12/6/2026 रोजी पक्षकार एरोठस्की रिएलीटीज तर्फे विशाखा कपिल तिराणकर हे त्यांचे मालकीचे मौजा नुन्हारा रैयतवारी ता. भद्रावती जि. चंद्रपूर येथिल सर्वे न. 34, प्लॉट न. 50 व 51 या दोन प्लाटची पंजीबध्द विक्री करण्याकरीता माझेकडे आले असल्याने मी सर्व दस्तऐवजाची पाहणी करून त्यांना मुद्रांक शुल्क व इतर लागणाऱ्या खर्चाची माहीती देवून सदर दस्ताचे संगणकीकृत कागदपत्रे तयार करून त्यांनतर पक्षकाराच्या सहया व अंगठे घेवून सदर दस्तऐवजावर मी दस्तऐवज तयार करून देणार (बकलम) म्हणुन माझी सही केल्यांनतर सह दुय्यम निंबधक कार्यालय क्र. 1, चंद्रपूर येथे नोंदणी करीता घेवून गेलो.

त्यांनतर श्री. शेट्टीवार, दुयम निंबधक, सह. दुयम निंबधक कार्यालय-1 चंद्रपूर यांनी सदर दस्ताची पाहणी करून मालमत्तेचे अधिकृत क्षेत्र हे भद्रावती तालुक्यातील असल्यामुळे चंद्रपूर दुयम निंबधक कार्यालयात सदर मालमत्तेची नोंदणी होणार नाही असे सांगून त्यांनी ''तुम्ही मला माझेकरीता पैसे दिल्यास दस्तऐवज पंजीबध्द विक्री आमचे कार्यालयातून करून देवू, नाहीतर तुम्ही भद्रावती येथिल दुयम निंबधक कार्यालयाकडून रजिस्ट्री करून घ्या'' असे म्हटले. तेव्हा मी दुयम निंबधकास मालमत्तेची रजिस्ट्री करून घ्या, अशी विंनती केल्याने त्यांनी ''ठिक आहे, मी तुमचे काम करून देतो पण केलेल्या रजिस्ट्रीचे मोबदला म्हणुन मला प्रत्येक रजिस्ट्रीवर दोन हजार रूपये असे तुमच्याकडील दोन रजिस्ट्रीचे एकुण 4,000/- रूपये दयावे लागतील, अन्यथा तुमचे पुढील कोणतेही रजिस्ट्रीचे काम मी करून देणार नाही.'' असे म्हणाले. त्यावर माझे पुढील काम थांबेल म्हणुन नाइलाजास्तव गै.अ. श्री. शेट्टीवार, दुयम निंबधक, कार्यालय चंद्रपूर यांना होकार दिला व सदर दस्तऐवजाची नोंदणी क्र. 2520/2026 व 2522/2026 दिंनाक 12/6/2026 रोजी झाल्यानंतर मी तिथून निघून गेलो.

त्यांनतर सांयकाळी 6/25 वा. सह. दुयम निंबधक कार्यालय क्र.1 चंद्रपूर येथिल डाटा ऑपरेटर प्रिती चौधरी हिने तिचे मोबाइल क्र. 8007920679 यावरून माझे मोबाइल क्र. 9518528359 यावर फोन करून दुयम निंबधक श्री. शेट्टीवार साहेबांनी सांगितलेले रजिस्ट्रीचे पैसे मला आणुन दया, असे सांगितले. त्यावर मी त्यांना बाहेरगावी असल्याचे सांगून सोमवारी येवून भेटतो असे सांगितले होते.

त्यांनतर मी दिंनाक 15/6/2026 रोजी सह. दुयम निंबधक कार्यालय क्र.1 चंद्रपूर येथे माझेकडील इतर दस्तऐवजाचे कामाकरीता गेलो होतो तेव्हा डाटा ऑपरेटर प्रिती चौधरी हिने मला बोलावून दिंनाक 12/6/2026 रोजी केलेल्या रजिस्ट्रीच्या कामाचे साहेबांनी सांगितलेले 4,000/- रू आणून दिले नाही, आता दया, असे म्हटल्याने मी तिला माझेकडे सध्या पैसे नाही, उदयाला दिंनाक 16/6/2026 रोजी येतो असे सांगून आपले काम आटोपून तिथून निघून गेलो.

मला श्री. शेट्टीवार, दुयम निंबधक, सह. दुयम निंबधक कार्यालय क्र.1 चंद्रपूर यांना 4,000/- रूपये लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी आज दिंनाक 16/6/2026 रोजी दुपारी 12/00 वा. लाचलुचपत प्रतिंबधक विभाग चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवून पोलीस उप अधीक्षक, श्री. अनिल जिट्टावार यांना भेटुन वरिल प्रमाणे लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगितले. त्यावरून त्यांनी आपणस बोलावून ओळख करून देवून आपणास पुढील

कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत सांगितले. त्यानंतर मी आपणास वरिल प्रमाणे सर्व हकीकत सांगितली असता आपण मला लेखी तक्रार देण्यास सांगितले. त्यावरून मी माझे हस्ताक्षरात श्री. शेट्टीवार, दुयम निंबधक, व सौ. प्रिती चौधरी, डाटा ऑपरेटर, दुयम निंबधक कार्यालय क्र.1 चंद्रपूर यांचेविरूध्द लेखी तक्रार देत आहे. गैरअर्जदार श्री. शेट्टीवार, दुयम निंबधक, व सौ. प्रिती चौधरी, डाटा ऑपरेटर, दुयम निंबधक कार्यालय क्र.1 चंद्रपूर यांचेशी माझा कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नसुन त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. माझे वैयक्तिक बचतीतील 4,000 /- रू. लाच रक्कम वापरण्याकरीता देत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ''एक जिल्हा एक नोंदणी'' या अंतर्गत एका जिल्हयातील कोणत्याही भागातील दस्त त्या जिल्हयातील कोणत्याही दुयम निंबधक कार्यालयात नोंदणीची सुविधा असतांना सुध्दा गै.अ. श्री. शेट्टीवार, दुयम निंबधक, दुयम निंबधक कार्यालय -1 चंद्रपूर यांनी माझेकडून दस्तऐवज नोंदणी क्र. 2520/2026 व 2522/2026 दिंनाक 12/6/2026 रोजीच्या दस्ताची रजिस्ट्री करून दिल्याचे कामाकरीता मोबदला म्हणुन दोन्ही रजिस्ट्रीचे 4,000/- रूपये स्वत: तसेच सौ. प्रिती चौधरी, डाटा ऑपरेटर, सह. दुयम निंबधक कार्यालय -1 चंद्रपूर हिचे मार्फतीने बेकायदेशीरपणे लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरूध्द कार्यवाही होणेस विंनती आहे.''

अशाप्रकारे तक्रारदाराने दिलेली तक्रार व त्यांनी तक्रारीसंबधी तोंडी कथन केलेला मजकूर सारखाच असल्याची दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचानी व आम्ही तक्रारीवर सही केली. तसेच तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीबाबत दस्तऐवज नोंदणी क्र. 2520/2026 व 2522/2026 चे छायान्कींत कागदपत्रे आमचेकडे दिल्याने आम्ही पंचानी व तक्रारदार यांनी सहया केल्यावर ती कागदपत्रात समाविष्ट केली. त्यांनतर तक्रारदार यांचेकडील लाचेत वापरण्यात येणारे 4,000/-रूपयांचे नोटांचे क्रमांक संगणकावर टंकलीखीत करून त्यांची प्रिंट काढुन त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी सहया केल्या. वरील नोटा व नोटांचे क्रमांक नमुद असलेली प्रत आम्ही आमच्या ताब्यात घेतल्या. तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/- रू दराच्या 08 नोटांचे क्रमांक पंच क्रं. 1 यांनी वाचले पंच क्र.2 यांनी पडताळुन पाहिल्या-

500/- रू. दराच्या 08 नोटांचे क्रंमांक खालीलप्रमाणे

अ.क्र
नोटांचे क्रमांक
अ.क्र
नोटांचे क्रमांक
अ.क्र
नोटांचे क्रमांक
अ.क्र
नोटांचे क्रमांक
1
1ES 836264
2
2GV 304145
3
3GS 158628
4
0KE 943798
5
1HL 007201
6
7AD 735470
7
1VU 148352
8
3AG 215165

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचाना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणाऱ्या अॅथ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा उपयोगाबाबत माहीती देवून अथ्रासिन पावडरचा संपर्क आलेल्या भागावर अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचे प्रकाशात पाहिल्यास पावडरला निळसर रंगाची चकाकी दिसुन येते असे सांगीतले व त्याबाबत पोशि/राजेंद्र चौधरी यांचे हस्ते प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यानंतर पोशि/राजेंद्र चौधरी यांना सापळा पार्टीतुन वगळण्यात आले. तसेच आमचे कार्यालयीन डिजीटल व्हॉइस रेकार्डर बाबत माहिती दिली व त्याचे काम करण्याची पध्दतीबाबत पोशि/राकेश जांभुळकर यांचे मार्फतीने माहिती देण्यात आली असून याबाबत सविस्तर नोंद प्रात्यक्षिक पंचनामा मध्ये घेण्यात आलेली आहे.

त्यानंतर तक्रारदाराने तक्रारीत सांगितल्याप्रमाणे गैरअर्जदार यांना आज रोजी सह, दुयम निंबधक कार्यालय क्र. 1 चंद्रपूर येथे येवून भेटतो असे सांगितले असल्याने पडताळणी/सापळा कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर नोंदी पंचनामा क्र 01 मध्ये घेण्यात आल्या).

त्यानंतर लाचेची मागणी पडताळणी करणे असल्याने, पडताळणी कार्यवाही अनुषंगाने पंच क्र 1 यांचे हस्ते तक्रारदाराची अंगझडती घेउन अंगझडती यादी तयार करून यादीवर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर अंगझडती यादीतील साहीत्य तक्रारदार यांना वेळीच परत करण्यात आले.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व पंच क्र. 01 यांना गैरअर्जदारांची प्रत्यक्ष भेट घेवून सत्यता पडताळणी करण्याकरीता पाठवितांना पडताळणी कार्यवाहीबाबत तक्रारदार व पंच क्र. 1 यांना सविस्तर सुचना दिल्या.

सापळा पडताळणी कार्यवाहीकरीता आमचे सुचनेवरुन पोशि/राकेश जांभुळकर यांनी SanDisk कंपनिचे 32GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5613U9 असे प्रिंट असलेले नवीन मेमरी कार्ड टाकुन असलेले व्हॉइस रेकॉर्डर वेळ 15/10 वा. रेकॉर्डीग सुरू करून पंच क्रं. 01 यांचे आवाजात तक्रारदार यांचेसह लाच रक्कमेच्या पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबत प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर डिजिटल व्हॉइस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यांनतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना वेळ 15/13 वा. तक्रारदाराचे बजाज डिस्कवर मो.सा. क्र. MH 34 AH 9894 नी रवाना केले. आम्ही सापळा पार्टीतील सदस्य व पंच क्र. 2 यांचेसह ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे थांबून राहीलो

त्यानंतर तक्रारदार हे पंच क्र. 1 यांचेसह ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे त्यांचे वाहनाने परत आल्याने आमचे सुचनेवरून पोशि/राकेश जांभुळकर यांनी तक्रारदाराचे गळयातील व्हॉइस रेकॉर्डर बाहेर काढून पंच क्र.1 यांच्या आवाजात वेळ 15/34 वा. बंद केले. त्यांनतर पंच क्र. 1 यांचे कडुन तक्रारदाराची पडताळणी नंतरची अंगझडती घेउन अंगझडती यादी तयार करून यादीवर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर अंगझडती यादीतील साहीत्य तक्रारदार यांना वेळीच परत करण्यात आले.

त्यांनतर पंच क्र. 1 यांना घडलेल्या घटनेक्रमाबाबत विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले की, ''तक्रारदारासह त्यांचे मो.सा. ने गैरअर्जदार यांचे कार्यालयाजवळ गेलेवर मो.सा. बाजुला लावून आम्ही कार्यालयात गेलो तेव्हा गै.अ. शेट्टीवार, दुयम निंबधक हे त्यांचे खुर्चीवर बसून असल्याचे तक्रारदाराने इशाऱ्याने सांगितले. आम्ही मागील खोलीत जावून तिथे हजर असलेल्या महिलेजवळ गेल्यावर तक्रारदाराने नमस्कार प्रिती मॅडम म्हणुन सुरवात करून बोलणी केली त्यांनतर त्यांचेत बोलणी होवून तक्रारदाराने त्याचेकडील रजिस्ट्री कामाचे सांगितलेवर गै.अ. प्रिती चौधरी हिने तक्रारदारास बाहेरील तालुक्याचे रजिस्ट्रीचे दोन हजार देतात असे म्हटल्याने तक्रारदाराने तिचेशी बोलणी करून साहेबांना बोलून पाहू असे म्हटले तर तिने बोलून पहा असे म्हणाली. त्यानंतर गै.अ. प्रिती चौधरी हिने माझेबाबत तक्रारदारास विचारणा केली. तेव्हा तक्रारदाराने पक्षकार आहे असे सांगितले. तेव्हा गै.अ. प्रिती चौधरी हिने मला ''थांबून जाण तुम्ही तिकडे'' असे म्हटल्याने मी त्या खोलीच्या लागूनच असलेल्या रूममध्ये येवून थांबलो. त्यांनतर तक्रारदार काही वेळातच माझेकडे आले व आम्ही तिथून निघून ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे परत आलो असे सांगितले. त्यावरून तक्रारदार यांना त्यांचे व गैरअर्जदारां मध्ये झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली असता तक्रारदार याने पंच क्र. 1 यांनी वरील सांगितलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. तसेच त्याने सांगितले की, तो गैरअर्जदार सौ. प्रिती चौधरी हिने प्रत्येकी रजिस्ट्रीचे दोन हजार असे दोन रजिस्ट्रीचे 4,000 /- रूपये असे सांगितले त्यावर गै.अ. शेट्टीवार यांना बोलून पाहु असे सांगून मी गै.अ. शेट्टीवार यांना दिसल्याने ते त्याचे खुर्चीवरून उठून आमचेकडे आले तेव्हा मी गै.अ. शेट्टीवार यांना केलेल्या रजिस्ट्रीचे कामाबाबत सांगितले असता त्यांनी बोलणी दरम्यान मला पंधराशे प्रमाणे दोन रजिस्ट्रीचे 3,000/- रूपये गै.अ. प्रिती चौधरी हिचेकडे दया, असे इशाऱ्याने सांगून साडेपाच-सहा वाजता येण्यास सांगितल्याने मी पंच क्र 1 सोबत ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो असल्याचे सांगितले.

सदर संभाषण व्हॉइस रेकॉर्डरच्या मेमरी कार्ड मध्ये '' FOLDER01'' मधील फाइल क्र 260616_1510 मध्ये

रेकॉर्ड झाले असून सदर संभाषण शासकीय लॅपटॉपमध्ये कॉपी करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, पंच क्र. 1 व तक्रारदाराने सांगितलेल्या हकीकत व त्यांनी दिलेल्या दुजोऱ्यावरून तसेच तक्रारदार व गैरअर्जदार यांचेत झालेल्या संभाषणावरून गै.अ. श्री. शेट्टीवार, दुयम निंबधक श्रेणी -1, दुयम निंबधक कार्यालय चंद्रपूर यांनी तक्रारदार यांचे पक्षकार यांच्या मालमत्तेच्या दस्तऐवजाची नोंदणी करून दिल्याचे मोबदला म्हणून 4,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 3,000/- रूपये डाटा ऑपरेटर श्रीमती प्रिती चौधरी मार्फत स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे आमचे व दोन्ही पंचाचे स्पष्ट मत झाले. त्यावरून आम्ही तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांचेसह गैरअर्जदारांकडे सापळा कार्यवाही करीता ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथूनच पाठविण्याचा सर्वानुमते निणय घेतला.

त्यानंतर सदर पडताळणी कार्यवाही मध्ये तक्रारदार तसेच गै.अ. श्री. शेट्टीवार, दुयम निंबधक, व सौ. प्रिती चौधरी, डाटा ऑपरेटर, दुयम निंबधक कार्यालय क्र. 1 चंद्रपूर यांचे व्हाइस रेकॉर्डरव्दारे मुळ मेमोरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेल्या संभाषणाचे शासकीय लॅपटॉपवर शब्दश: स्क्रिप्ट मपोशि/मेघा मोहुर्ले यांचे हस्ते तयार केली. त्यांनतर सापळा कार्यवाही पुर्वी तक्रारदार यांची पंच क्र. 1 यांचे हस्ते अंगझडती घेवुन हस्तलिखीत अंगझडती तयार करण्यात आली. सापळा कार्यवाही संबंधाने तक्रारदार व पंच क्र. 1 व 2 यांना सुचना देण्यात आल्यात तसेच स्टाफ यांना आपापल्या भुमिकेबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी लाचरक्कम 500 रू. दराच्या 06 चलनी नोटा असे 3,000/- रुपये आपले उजवे हाताने घेवुन तक्रारदार यांचे शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवले . उर्वरित 1VU 148352, 3AG 215165 या क्रमांकाचे नोटा वेगळ्या लिफाफ्यात ठेवण्यात आले त्यांनतर पंच क्र. 2 यांनी साबण पाण्याने हात स्वच्छ धुवुन घेतले. असून कार्यवाही संपताच तक्रारदार यांना उर्वरित दोन नोटा परत करून पोचपावती लिहून घेण्याची तजवीज ठेवली आहे

त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पोशि/राकेश जांभुळकर यांनी व्हाइस रेकॉर्डर मधील SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5613U9 असे प्रिंट असलेले मेमरी कार्ड मध्ये फाइल क्र. 260616_1510 व्यतीरीक्त इतर कोणतीही फाइल नसल्याबाबत खात्री करून दिली. तसेच पोहवा/रविंकात इंगळे यांना लाचरक्कम जप्तीचे व्हिडीओ चित्रीकरण्याबाबत सुचना दिली असता त्यांनी कार्यालयीन SONY कंपनीचे हॅन्डीकॅम कॅमेरामध्ये SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5612CQ असे पिंट असलेले मेमोरी कार्ड टाकुन त्याचे ताब्यात घेतले.

त्यानंतर पोशि/राकेश जांभुळकर यांनी वरीलप्रमाणे मेमरी कार्ड टाकुन असलेले व्हाइस रेकॉर्डरमधील 17/30 वा. रेकॉर्डींग सुरू करून पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना वेळ 17/33 वा. तक्रारदाराचे बजाज डिस्कवर मो.सा. क्र. MH 34 AH 9894 नी रवाना केले. त्यांचे मागोमाग आम्ही, पोउपअधी श्री. अनिल जिट्टावार, पंच क्र. 2 व पोहवा/रविंकात इंगळे, पोहवा/हिवराज नेवारे, पोशि/प्रदीप ताडाम, पोशि/अमोल सिडाम, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/सचिन गजभिये, पोशि/महेश माहुरपवार, मपोशि मेघा मोहुर्ले असे खाजगी मो.सा. व चारचाकी वाहनाने ट्रॅप बॅगमध्ये अल्ट्राव्हायलेट दिवा (टॉर्च), काळा कपडा, सिल करण्याचे साहित्य, मोजमाप करण्याचा टेप, व स्टेशनरी, शासकिय लॅपटॉप, प्रिन्टर, व त्याचे जोडणी साहीत्य सोबत घेवून रवाना होवून गैरअर्जदारांचे कार्यालय परिसरात पोहचून आजुबाजुला कुणालाही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीलो. काही वेळानी तक्रारदार हे सह दुयम निबधक कार्यालय क्र.1 चे बाहेर येऊन गैरअर्जदाराने लाच स्विकारल्याबाबत आपले गळयातील दुपट्टा डाव्या हातानी काढून डाव्या हातातच ठेवून नियोजीत इशारा केला. तेव्हा आम्ही व सोबत असलेले पंच क्र. 2 व स्टॉफ हे घटनास्थळी आलो व तक्रारदारास बाजुला थांबून राहण्याबाबत इशारा करून कार्यालयातील गैरअर्जदार यांना एकत्र मागील खोलीत घेवून जावून आम्ही, पंच क्र. 01 यांना लाच रक्कम कुणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, त्यांनी कार्यालयाचे मागील खोलीत खुर्चीवर बसलेल्या गै.अ. महिलेकडे बोट दाखवून सदर महिला गै.अ. प्रिती चौधरी असून त्यांनीच तक्रारदाराकडून लाच रक्कम स्विकारून तिचेकडील पर्समध्ये ठेवले असल्याचे सांगितले. त्यानंतर पोशि/राकेश जांभुळकर यांचे हस्ते पंच क्र. 1 यांचे आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हाइस रेकॉर्डर 17/49 वा बंद करण्यात आले.

आम्ही गैरअर्जदारांना सापळा कार्यवाही कामी सहकार्य करण्यास सांगून त्यांचे संपूर्ण नाव, पत्ता इ. माहिती विचारली असता त्यांनी अनुक्रमे आपले नाव 1) श्री. मोहन चंद्रकांत शेट्टीवार वय 31 वर्षे, धंदा नोकरी पद- दुयम निंबधक श्रेणी-1, कार्यालय- सह. दुयम निंबधक कार्यालय क्र. 1 चंद्रपूर रा. श्री. एंगलवार यांचे घरी किरायाने, हनुमान मंदीरजवळ, तुकूम चंद्रपूर जि. चंद्रपूर मुळ पत्ता- अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड 2) सौ. प्रिती वैभव चौधरी (माहेरकडील प्रिती मशाखेत्री) वय 36 वर्षे, पद- संगणक डाटा ऑपरेटर,सह. दुयम निंबधक कार्यालय क्र. 1 चंद्रपूर (खाजगी) रा. अंचलेश्वर वार्ड न. 1, दासरवाडा जवळ चंद्रपूर असे सांगितले.

त्यांनतर गै.अ. सौ. प्रिती चौधरी हिला लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता तिने सदरची लाच रक्कम तिचे समोरील टेबलाच्या ड्रावरमधून पर्स बाहेर काढून पर्सची चैन खोलून त्यामध्ये पैसे असल्याचे दाखविले त्यावर आम्ही पंच क्र. 2 यांना सदर पर्समधील असलेली रक्कम बाहेर काढण्यास सांगितल्याने त्यांनी पर्समधील रक्कम बाहेर काढल्याने लाच रक्कमेपेक्षा जास्त रक्कम दिसून आल्याने आम्ही ती रक्कम बाहेर काढून पंचांना नोटांचे क्रमांक तपासून पाहण्यास सांगून पंच क्र. 2 यांना नमूद क्रमांकाचे नोटा वेगळ्या काढण्यास सांगितल्या. त्यावरून पंच क्र. 2 यांनी त्या पर्समध्ये वर असलेल्या नोटांचा बंडल काढून 3000/- रू मोजून घेतल्यांनतर लाच रक्कमेच्या नोटांचे क्रमांक पंच क्र. 2 यांनी वाचले व पंच क्र. 1 यांनी पंचनामा क्र. 1 मधील नमुद नोटाच्या क्रमांकाशी जुळवुन पाहीले असता 3,000/-रूपये ज्यात 500 रू दराच्या 06 नोटांचे क्रमांकाशी जुळुन आले. त्यानंतर सह. दुयम निंबधक कार्यालय क्र. 1 चंद्रपूर चे मागील खोलीतील सर्व लाइट बंद करून प्रकाशाची तिव्रता कमी झालेवर आमचे सुचनेवरून पोशि/अमोल सिडाम यांनी अल्ट्राव्हायलेट दिव्यात आम्हा सर्वांचे हात अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता कोणाचाही हाताला निळसर रंगाची चकाकी दिसून येत नसल्याची गैरअर्जदारांना खात्री करून देवून पंच क्र. 2 यांचे हातातील लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता नोटांना निळसर रंगाची चकाकी दिसून आल्याने आमचे व दोन्ही पंचाची लाच रक्कम असल्याची खात्री झाली. तसेच सौ. प्रिती चौधरी यांनी लाच रक्कम तक्रारदाराकडून स्विकारल्याने तिचे दोन्ही हात व तिचेकडील पर्सची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता तिचे दोन्ही हाताच्या बोटाचे टोकाला व पर्सचे बाहेरील व आतील बाजुला निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यांनतर तक्रारदाराचे दोन्ही हात व शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्याला अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासले असता त्यांचे उजव्या हाताचे संपुर्ण बोटांना व शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्याला निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.

तसेच लाच रक्कमेबाबत असलेल्या इतर नोटांच्या बंडल सुध्दा अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासले असता सदर बंडलवर सुध्दा लाच रक्कमेच्या संपर्कात आल्याने निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यांनतर अतिरिक्त मिळुन आलेली रक्कम पंच क्र. 1 व पोशि/सचिन गजभिये यांना मोजण्यास सांगितली असता ती 10,500/- रू इतकी दिसून आली.

त्यांनतर लाच रक्कम लिफाप्यामध्ये सुरक्षित ठेवून सिंलबद केल्यानंतर लाच रक्कमेचा लिफाफा आम्ही आमचे ताब्यात घेतला. तसेच गै.अ. सौ. प्रिती चौधरी हिने लाच रक्कम ठेवण्याकरीता वापरलेली पांढ्या रंगाची पर्स लिफाप्यामध्ये सुरक्षित ठेवून सिंलबद केल्यानंतर लिफाफा आम्ही आमचे ताब्यात घेतला तसेच पर्समध्ये मिळून आलेले 10500/- रू. रक्कमेबाबत गै.अ. प्रिती चौधरी तसेच गै.अ. मोहन शेट्टीवार यांना विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने सदरची रक्कम एका वेगळ्या लिफाप्यामध्ये सुरक्षित ठेवून सिंलबद करून लिफाफा ताब्यात घेतला. त्या तिनही जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंच व गै.अ.सौ. प्रिती चौधरी यांनी सहया केल्यात.

त्यांनतर गै.अ. मोहन चंद्रकांत शेट्टीवार, याची पंच क्र. 1 यांचे हस्ते व गै.अ. सौ. प्रिती चौधरी हिची पंच क्र. 2 यांचे हस्ते अंगझडती घेवून अंगझडतीत मिळुन आलेला वस्तुची वेगळी यादी तयार करण्यात आली. अंगझडतीत मिळुन आलेले साहित्य व रोख रक्कम आरोपींना वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर आम्ही, दोन्ही पंच आणि गैरअर्जदानी आपआपले अंगझडती यादीवर स्वाक्षरी केलेली आहे. गैरअर्जदारांकडे मिळुन आलेला मोबाइल आम्ही तपासकामी जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्याची तजवीज ठेवली. सदर बाबतची व्हिडीओ रेकॉडीग करण्यात आली आहे. सदरचे घटनास्थळ हे सह दुयम निंबधक कार्यालय क्र. 1 चंद्रपूर, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर चंद्रपूर येथिल आहे. त्यानंतर आम्ही पोशि/प्रदीप ताडाम यांना घटनास्थळाचा कच्चा नकाशा काढण्याबाबत सुचना देवून कार्यवाहीदरम्यान कोण कुठे होते त्याबाबत सविस्तर सागितले असता त्यांनी सदर घटनास्थळाचा कच्चा नकाशा तयार केला. त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

सदरचे ठिकाणी लोकांची गर्दी होत असल्याने कार्यवाहीमध्ये बाधा येवू नये याकरीता सुरक्षेच्या दृष्टीने व आमचे ला.प्र. वि. कार्यालय जवळच असल्याने आम्ही पुढील पंचनामा कार्यवाही करिता ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे जाण्याचे ठरवून त्याठिकाणी पोहचलो.

त्यांनतर तक्रारदाराची पंच क्र. 1 यांचे हस्ते अंगझडती घेवून मिळालेले साहीत्य व रोख रक्कमेच्या नोंदी घेतल्यानंतर मिळालेले साहीत्य परत करण्यात आले. तक्रारदार, दोन्ही पंच व आम्ही अंगझडती यादीवर स्वाक्षरी केली.

यानंतर आम्ही, पंच क्र. 1 विनोद मोतीराम ठाकरे यांना सापळा कार्यवाहीवेळी तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात लाच देवाण घेवाण झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगितले की, ते तक्रारदार यांचे सोबत सह. दुयम निंबधक कार्यालय क्र. 1 चंद्रपूर येथे कार्यालयात गै.अ. प्रिती चौधरी यांचेकडे गेले तेव्हा तक्रारदार व गै.अ. प्रिती चौधरी यांचेत बोलणी होवून तक्रारदाराने गै.अ. प्रिती चौधरी हिला ''तिन हजार म्हणे साहेब, पंधराशे पंधराशे'' असे म्हणाले तर गै.अ. प्रिती चौधरी हिने ''ठिक आहे, दया असे म्हटल्यावर तक्रारदाराने त्याचे शर्टचे समोरील

डाव्या बाजुच्या खिश्यातुन उजव्या हातानी लाच रक्कम काढून दिल्याने गै.अ. प्रिती चौधरी हिने ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारून तिचेकडील पांढ्या रंगाचे पर्समध्ये ठेवले त्यांनतर ती स्वतकरीता सुध्दा पाचशे रूपयाची मागणी करू लागल्याने तक्रारदाराने नंतर देतो असे म्हणुन तक्रारदार व मी कार्यालयाचे बाहेर आल्यानंतर तक्रारदाराने नियोजीत इशारा करताच आपण त्याठिकाणी आले'' असे सांगितले. त्यावरून तक्रारदाराने पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला.
त्यांनतर आमचे सुचनेनुसार सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे गळ्यात अडकवून पाठविलेले व्हाइस रेकॉर्डर पोशि/राकेश जांभुळकर यांनी लॅपटॉपला कनेक्ट केले असता मेमोरी कार्डमध्ये FOLDER 01 मध्ये 260616_1510 या नावाची फाइल व्यतिरीक्त 260616_1730 या नावाची फाइल दिसून आली. सदर फाइल कॉपी केल्यानंतर आम्ही दोन्ही पंच, तक्रारदार यांचेसमक्ष व्हॉइस फाइल फॉरवर्ड करुन ऐकली. यानंतर आम्ही पोशि/सचिन गजभिये यांचे हस्ते सापळा कार्यवाही मध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे सापळा कार्यवाही दरम्यान व्हाइस रेकॉर्डरव्दारे ध्वनीमुद्रीत करण्यात आलेल्या संभाषणाचे लॅपटॉपव्दारे शब्दश: स्क्रिप्ट तयार करण्यात आली त्यानंतर पडताळणी/सापळा कार्यवाहीचे मेमरीकार्ड मधील रेकॉर्ड व्हाइस फाइल क्र.260616_1510 व 260616_1730 याची लॅपटॉपमधील Sevenza Hash Calculator या सॉफ्टवेअरद्वारे हॅश व्हॅल्यु काढून प्रिन्ट काढल्यानंतर त्या हॅश व्हॅल्यु प्रमाणपत्रावर पोशि/राकेश जांभुळकर व दोन्ही पंचानी समक्ष म्हणून सहया केल्या आहेत. सदर पडताळणी/सापळा कार्यवाहीचे SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5613U9 असे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करून एका कागदी लिफाप्यात सुरक्षित जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी स्वाक्षरी केल्यावर लाखेने सिंलबद केले.
तसेच आमचे सुचनेवरून पोहवा/रविंकात इंगळे यांनी सापळा कार्यवाही दरम्यान गै.अ. प्रिती चौधरी यांचेकडून लाच रक्कमेची, तिचेकडे मिळुन आलेल्या 10,500/- रक्कमेची व लाच रक्कम ठेवण्याकरीता वापरलेल्या पर्सची जप्ती व गैरअर्जदारांची अंगझडती कार्यवाहीचे चित्रीकरणाचे SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5612CQ असे पिं्रट असलेले मेमोरी कार्ड SONY कंपनीचे हॅन्डीकॅम कॅमेरा लॅपटॉपला कनेक्ट केले असता PRIVATE/AVCHD/BDMY/STREAM या मध्ये 00000 या नावाची व्हिडीओ फाइल दिसुन आली. त्यां फाइलचे Sevenza Hash Calculator सहायाने हॅश व्हॅल्यु काढून प्रिन्ट काढली. त्यावर दोन्ही पंचानी व पोहवा/रविंकात इंगळे यांनी समक्ष म्हणून सही केल्यानंतर कागदपत्रात समाविष्ट केली. सदर फाइल्स असलेले सदरचे मेमरी कार्ड एका कागदी लिफाप्यात सुरक्षित ठेवले. सदर सापळा व्हिडीओ कार्यवाहीचे SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5612CQ असे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करून एका कागदी लिफाज्यात सुरक्षित जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी स्वाक्षरी केल्यावर लाखेने सिंलबद केले.
त्यानंतर गै.अ. मोहन चंद्रकांत शेट्टीवार व गै.अ. प्रिती वैभव चौधरी यांना झालेल्या लाचेची सापळा कार्यवाहीबाबत त्यांचे काय म्हणणे आहे? याबाबत लेखी निवेदन लिहून देण्याकरीता सांगितले व कोरे कागद आणि पेन त्यांना उपलब्ध करून दिले. त्यावरून त्यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरातील निवेदन आम्हास सादर केले. सदर निवेदनावर दोन्ही पंचानी स्वाक्षृया केल्या व आम्ही समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली.
त्यांनतर गै.अ. श्री. मोहन चंद्रकांत शेट्टीवार यांचेकडून ताब्यात घेण्यात आलेला पोको कंपनीच्या मोबाइलची पाहणी पंचनामा तयार करून जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले. त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी व गै. अ. मोहन शेट्टीवार यांनी सहया केल्यात.
तसेच गै.अ. सौ. प्रिती वैभव चौधरी यांचेकडून ताब्यात घेण्यात आलेला रिअल मी कंपनीच्या मोबाइलची पाहणी पंचनामा तयार करून जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी व गै.अ प्रिती चौधरी यांनी सहया केल्यात.
तरी यातील आलोसे क्र. 1) श्री. मोहन चंद्रकांत शेट्टीवार वय 31 वर्षे, धंदा नोकरी पद- दुयम निंबधक श्रेणी-1, कार्यालय- सह. दुयम निंबधक कार्यालय क्र. 1 चंद्रपूर यांनी तक्रारदार यांचे पक्षकार यांच्या मालमत्तेच्या दस्तऐवजाची नोंदणी करून दिल्याचा मोबदला म्हणून स्वत: व आरोपी क्र. 2) सौ. प्रिती वैभव चौधरी (माहेरकडील प्रिती मशाखेत्री) वय 36 वर्षे, पद- संगणक डाटा ऑपरेटर, सह. दुयम निंबधक कार्यालय क्र. 1 चंद्रपूर (खाजगी महिला) यांचे मार्फतीने 4,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती 3,000/- रूपयाची लाच रक्कम आरोपी क्र. 2) प्रिती वैभव चौधरी यांचे मार्फतीने स्विकारल्याने त्यांचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, (सुधारणा 2018) कलम 7,7 अ अन्वये कायदेशीर कार्यवाही होणेकरीता माझी कायदेशीर फिंयाद आहे.

( सचिन एस. धर्मेजवार )

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिंबधक विभाग चंद्रपूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
PRABHAWATI TRYAMBAK EKURKE(I (Inspector)) / POBN085424 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRABHAWATI TRYAI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN085424

ड्युटी ऑफीसर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)